सत्यमेव जयते

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०

महाराष्ट्र शासन

## राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र, मुंबई

जुने प्रशासकीय महाविद्यालय इमारत, रु.नं.१, २, ५ व ६ हजारीमल सोमानी मार्ग,
छत्रपती शिवाजी टर्मिनससमोर, मुंबई- ४०० ००१
०२२-२२०५७४०९/२२०७२०९७/२२८२१८१० E-mail : mah-sforum@nic.inWebsite:- www.grahak.maharashtra.gov.in

जा.क्र.राआ/महा./आस्था/शिर.अधि.ज.सं.अ./पदोन्नती /२०२४/ ४२११ दिनांक - १२ सप्टेंबर, २०२४

### कार्यालयीन आदेश

ग्राहक संरक्षण यंत्रणेतील राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग व अधिनस्त असलेल्या जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या आस्थापनेवरील शिरस्तेदार/अधिक्षक/जनसंपर्क अधिकारी, गट-ब अराजपत्रित, या संवर्गातील राज्यस्तरीय रिक्त पदे भरण्याकरीता राज्य निवडसमितीच्या दिनांक १२/०९/२०२४ रोजीच्या बैठकीमध्ये सहायक अधिक्षक या संवर्गातील खालील कर्मचा-यांची पदोन्नतीकरीता शिफारस करण्यात आली आहे.

सहाय्यक अधिक्षक (गट क ) संवर्गातील खालील, विवरणपत्रात नमूद पदोन्नतीस पात्र ठरविण्यात आलेल्या कर्मचा-यांना महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम २०१९ संरचनेतील वेतन बँड एस-१४ [S-१४] [३८६००-१२२८००] ( ६ वा वेतन आयोगानुसार वेतन बँड रु.९३००- ३४८०० अधिक ग्रेड वेतन रु. ४३००/-) या वेतनश्रेणीतील शिरस्तेदार/अधिक्षक या पदावर त्या पदाचा कार्यभार स्विकारतील त्या दिनांकापासून तात्पुरती पदोन्नती देण्यात येत आहे. त्यांची विवरणपत्रातील रकाना क्र.४ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी मा.नागरी सेवा मंडळ, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई यांच्या दिनांक १२/०९/२०२४ च्या बैठकीत शिफारस केल्यानुसार पदोन्नतीने पदस्थापना करण्यात येत आहे.

| अ. क्र. | कर्मचा-यांचे नांव | सध्या कार्यरत असलेल्या कार्यालयाचे नांव | पदोन्नतीने पदस्थापना दिलेले पद व ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्री. हि. त्र्यं. देशमुख | जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, धुळे | शिरस्तेदार, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, अमरावती (रिक्त पदावर) |
| २ | श्रीमती. भा. अ. जोशी | जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग,सातारा | शिरस्तेदार, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, अतिरिक्त पुणे (रिक्त पदावर) |
| ३ | श्री. सा.गो. गोविंदवार | राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई. | शिरस्तेदार, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, रायगड (रिक्त पदावर) |
| ४ | श्रीम. प्र. सु. सोनवणे | जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग,पुणे | शिरस्तेदार, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, नाशिक (रिक्त पदावर) |
| ५ | श्रीम सं. अ. काकडे | जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग,कोल्हापूर | शिरस्तेदार, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, सांगली (रिक्त पदावर) |
| ६ | श्री. वि. ग. आंचेवार | जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग,यवतमाळ | शिरस्तेदार, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, परभणी (रिक्त पदावर) |
| ७ | श्री. भा. र. गर्कळ | जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, सोलापूर | शिरस्तेदार, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, सोलापूर (रिक्त पदावर) |
| ८ | श्री. आर. जे. चव्हाण | जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, जालना | शिरस्तेदार, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड (रिक्त पदावर) |
| ९ | श्री. प्र. गु. पाटील | जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, वर्धा | शिरस्तेदार, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, वर्धा (रिक्त पदावर) |
| १० | श्री. सु. कि. सबनीस | जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, औरंगाबाद | शिरस्तेदार, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, जालना (रिक्त पदावर) |

वरील कर्मचा-यांना शिरस्तेदार/अधिक्षक या पदावरील तात्पुरत्या स्वरुपातील पदोन्नती मा. सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनूमती याचिका क्र. २८३०६/१७ च्या निर्णयाच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

प्रबंधक,राज्य आयोगाचे परिक्रमा खंडपीठ नागपूर/औरंगाबाद व प्रबंधक,सर्व जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग,यांनी वरील कर्मचा-यांना पदोन्नतीच्या पदावर रुजू होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करावे व पदोन्नतीच्या पदावर रुजू करुन घेवून त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

सदर आदेश या कार्यालयाच्या www.grahak.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले असल्यामुळे, सदर आदेशाच्या अनुषंगाने उपरोक्त कर्मचा-यांना कार्यमुक्त करणे अथवा हजर करुन घेण्याबाबत संकेत स्थळावरील प्रत ग्राहय धरण्यात यावी.

(उमेश सु. चव्हाण)
प्र.प्रबंधक (प्रशासन)
राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग,
महाराष्ट्र, मुंबई

प्रति,
संबंधित कर्मचारी,
प्रतिलिपी
१. प्रबंधक(विधी), राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई.
२. प्रबंधक(विधी), राज्य आयोगाचे परिक्रमा खंडपीठ, औरंगाबाद/ नागपूर
३. सर्व प्रबंधक, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग,
४. अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई
५. जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय मार्फत संबंधित जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग,
६. कार्यालयीन आदेश नस्ती/वैयक्तिक नस्ती (संबंधित कर्मचारी)